# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७ डॉ आंबेडकर रोड, पुणे विभाग,पुणे-१
Web:www.jdhepune.info E_mail ID- jdhepune@gmail.com

फोन नं.०२०-२६१२७८३३/२६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.ससं/उशि/पुवि/बी.व्होक/विषय-अभ्यासक्रम/साफुपुवि/२०२२/ ११४६ दि.०७/०5/2022 5 MAY 2022

प्रति,
कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड,
पुणे ४११ ००७.

**विषय — बी.व्होक अभ्यासक्रमांना मान्यता देणेबाबत...**

संदर्भ - (१) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ,एनजीसी-२०१८/(३२२/१८)/मशि-४, दि. २५/०९/२०२०

२) प्राचार्य, तुळजाराम चतूरचंद महाविद्यालय, बारामती, पुणे यांचेकडील पत्र क. ५२२, दि. १९/०३/२०२२.

उपरोक्त विषयाचे संदर्भात कंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने National Vocational Education Qualification Framework या नावाचा कौशल्य विकास कार्यक्रम सुरु केलेला आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या वित्त विभागाने National Skill Qualification Framework ही योजना लागू केलेली आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगाने Guidelines for introduction of Bachelor of Vocation (B.VOC.) Programme in Univesities and Colleges under the National Skills Qualifications Framework (NSQF) निर्गमित केलेले आहेत. सदर मार्गदर्शक तत्वानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने B.Voc. अभ्यासक्रमांना मंजूरी दिलेली आहे. तथापि, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ अन्वये या अभ्यासक्रमांना शासनाची मान्यता आवश्यक आहे. यातील तरतूदीनुसार शासनाने संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे त्या-त्या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठाने शिफारशीत केलेले बी.व्होक अभ्यासक्रम विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेप्रमाणे आवश्यतेनुसार पूर्वलक्षीप्रभावाने सुरु करण्यास कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

| संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयातील अ.क्र. | संस्था/महाविद्यालयाचे नाव | बी. व्होक (B.Voc.) अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| ०१ | अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे, तुळजाराम चतूरचंद महाविद्यालय, बारामती, ता. बारामती, जि. पुणे - ४१३ १०२ | B.Voc<br>1) E-Commerce and Digital Markenting (50)<br>2) Netrok and system Administration (50) |

उक्त संस्थेने शासन आदेशानुसार रु.१००/- च्या नॉन ज्युडिसिअल स्टॅम्प पेपरवर उक्त अभ्यासक्रमासाठी भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत असे हमीपत्र संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयाकडे सादर केलेले आहे. या हमीपत्राच्या आधारे खालीलप्रमाणे शिफारस करण्यात येत आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार तसेच अटी व शर्तीनुसार महाविद्यालयाने संबंधीत विद्यापीठाने विहित केलेल्या निकषांनुसार व विद्यापीठ अनुदान आयागाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार अध्यापक / कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक आहे. तसेच इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी सुविधा उपलब्धतेबाबत तसेच शासन मंजुरी आदेशातील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे अनुपालन करावे. व्यवस्थापनाच्या उपरोल्लोखित अभ्यासक्रमासाठी संलग्निकरण करण्याची प्रक्रिया सुरु करण्यास हे कार्यालय शिफारस करीत आहे.

उक्तप्रमाणे शासनाच्या संदर्भिय निर्णयान्वये कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी शासनास, मा.संचालनालयास तसेच या कार्यालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.किरणकुमार बोंदर)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत :-
१) मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) प्राचार्य, अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे, तुळजाराम चतूरचंद महाविद्यालय, बारामती, ता. बारामती, जि. पुणे - ४१३ १०२

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
(०२०) २५६९ १२३३
२५६२ ११८८
२५६२ ११८९
२५६२ ११९०
२५६२ ११९१

**शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)**
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : (०२०) २५६९ १२३३
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
इ–मेल : affiliation@pun.unipune.ac.in


संदर्भ क्र. : सीए/१०४१ दिनांक : १४ जुलै, २०२२

प्रति,
मा. प्राचार्य,
अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती, जि. पुणे – ४१३ १०२
युनिपुणे. आय. डी. : CAAP010100

**विषय :** विद्यापीठ अनुदान आयोगाने **National Skills Qualification Framework** अंतर्गत बी.व्होक. अभ्यासक्रमांस/कम्युनिटी महाविद्यालयांस पहिल्या वेळेचे संलग्नीकरणाबाबत तसेच संलग्नीकरणाचे नुतनीकरण व नैसर्गिक वाढीबाबत...

**संदर्भ :**
१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी–२०१७/(२०८/१७)/मशि–४, दिनांक १३ सप्टेंबर, २०१७
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक : एनजीसी २०१८/(३२२/१८)/मशि–४, दिनांक २५ सप्टेंबर, २०२०.
३) मा. सहसंचालक (उच्च. शिक्षण), पुणे विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे–०१ यांचे पत्र क. ससं/उशि/पुवि/बी.व्होक/विषय–अभ्यासक्रम/साफुपुवि/२०२२/११५८, दिनांक ०५/०५/२०२२

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय शासन आदेश/निर्णयाबाबत प्राप्त आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयास पुढील विवरणात नमूद करण्यात आलेल्या बी.व्होक. अभ्यासक्रमांस/कम्युनिटी महाविद्यालयांस त्या त्या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या/ **NSQF** च्या मान्यतेप्रमाणे आवश्यकतेनुसार पूर्वलक्षीप्रभावाने सुरू करण्यास संदर्भीय शासन निर्णयाद्वारे/आदेशाद्वारे 'कायम विना अनुदान तत्वावर' मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०८ आणि ११० मधील तरतूदी तसेच संदर्भीय शासन निर्णयातील/आदेशातील अटी व शर्तीच्या आणि विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन तसेच प्रस्तुत विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित आणि निर्गमित करण्यात आलेल्या नियम, आदेश, परिनियम, अध्यादेश इत्यादींमधील तरतूदींच्या तसेच सदर अभ्यासक्रमांस/महाविद्यालयांस आकारण्यात आलेले त्या त्या शैक्षणिक वर्षाच्या अर्जाचे शुल्क व विहित शुल्क भरण्याच्या अटीवर त्या त्या शैक्षणिक वर्षासाठी पहिल्या वेळेचे संलग्नीकरण आणि संलग्नीकरणाचे नुतनीकरण तसेच नैसर्गिकवाढ देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संदर्भ क्र. २ मधील शासन निर्णय/ आदेशातील अ.क्र. | बी.व्होक. अभ्यासक्रमांसाठी/कम्युनिटी महाविद्यालयासाठी **NSQF** ने मंजूरकेलेल्या अभ्यासक्रमाचा तपशील | शैक्षणिक वर्ष | संलग्नीकरणाचा तपशील/प्रकार | विद्यार्थी प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|---|
| १. | ०१ | **<u>B.Voc.-</u>**<br>1. E-Commerce and Digital Marketing<br>2. Network and system Administration | २०१९—२०२० | पहिले संलग्नीकरण | **प्रत्येकी ५० विद्यार्थी प्रवेश क्षमता** |
| | | | २०२०—२०२१ ते २०२१—२०२२ | नैसर्गिक वाढ | |
| | | | २०२०—२०२१ ते २०२२—२०२३ | संलग्नीकरणाचे नूतनीकरण | |

आपणांस पुढे असेही कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदींचे तसेच विद्यापीठ अनुदान आयोग/ **NSQF** व भारत सरकार, महाराष्ट्र शासन तसेच प्रस्तुत विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित आणि निर्गमित करण्यात आलेल्या व येणाऱ्या नियम, आदेश, परिनियम, अध्यादेश इत्यादींचे पालन करणे त्याचप्रमाणे आवश्यक तेवढया अर्हताधारक प्राचार्य, संचालक शारीरिक शिक्षण, ग्रंथपाल, अध्यापक व अध्यापकेतर कर्मचारी यांची नियुक्ती करणे तसेच आवश्यक ते निधी स्थापित करणे व ठेवणे आपल्या संस्थेवर/महाविद्यालयावर बंधनकारक राहील.

उपरोक्त बी.व्होक/कम्युनिटी महाविद्यालयांच्या नैसर्गिक वाढ/विस्तारिकरण संदर्भातील प्रस्ताव हे विहित मुदतीत व शासनाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या व येणाऱ्या आदेशानुसार विहित पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

13/7/2022

(स. द. डावखर)
उपकुलसचिव

**<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर:</u>**

१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई—३२
२) मा. सह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई—३२
३) मा. उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई—३२
४) मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन, पुणे — ४११ ००१
५) मा. सह—संचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे — ४११ ००१
६) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
७) मा. वित्त व लेखा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ
८) मा. आय. टी. मॅनेजर, प्रस्तुत विद्यापीठ
९) उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१०) उपकुलसचिव, छाननी व तालिनीकरण कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ
११) उपकुलसचिव, पदवी प्रमाणपत्र कक्ष, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
१२) उपकुलसचिव, नियोजन व विकास विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१३) उपकुलसचिव, व्यवस्थापक माहिती कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ
१४) सहायक कुलसचिव, अंतर्गत गुणवत्ता व सिध्दता कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ
१५) सहा.कुलसचिव, आरक्षण विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१६) सहा.कुलसचिव, समन्वय कक्ष, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
१७) सहा.कुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ